म्हाडा
MHADA

# उपमुख्य अधिकारी / पणन विभाग,

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई

कक्ष क्र.२४०, पहिला मजला, गृहनिर्माण भवन (म्हाडा) कलानगर वांद्रे (पूर्व) मुंबई-५१

जा.क्र. उपमुअ (पणन)/मुं.मं./सुविधा भूखंड/ग.लि.७/ E-९७१९५१७६ /२०२६

दिनांक: 15/09/2026

## शुध्दीपत्रक

**विषय :-** मुंबई मंडळाच्या वसाहतीच्या अभिन्यासातील "प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य" (FCFS) या तत्वावर वितरीत करावयाच्या सुविधा भूखंडांकरीता प्रसिध्द करण्यात आलेली जाहिरात दिनांक २०.०८.२०२६

उपरोक्त संदर्भान्वये मुंबई मंडळांतर्गत वसाहतीच्या अभिन्यासातील विकसित न झालेल्या एकूण ८ सुविधा भूखंडांच्या वितरणाबाबत/हस्तांतरणाबाबत "प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य" (FCFS) या तत्वावर दिनांक २०.०८.२०२६ रोजी https://eauction.mhada.gov.in/MumbaiBoardFcfsPlot या मेन पोर्टलवर तसेच https://mhada.gov.in या म्हाडा संकेतस्थळावर जाहीरात प्रसिध्द करण्यात आली होती.

सदर जाहीरातीतील वेळापत्रकानुसार प्रस्तुत भूखंडांकरीता 1st Cycle मधील प्राप्त अर्जांची छाननी करुन "प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य" (FCFS) या क्रमानुसार पात्र/ अपात्र अर्जदारांची यादी प्रसिध्द करावयाची तारीख १५.०९.२०२६ रोजी सायं. ०५.०० वाजता अशी नमूद करण्यात आलेली आहे. तसेच 2nd Cycle (शिल्लक भूखंड व नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या भूखंडांकरीता) व 3rd Cycle (शिल्लक भूखंड व नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या भूखंडांकरीता) या दोन्ही Cycle बाबतचे वेळापत्रक देखील नमूद करण्यात आलेले आहे.

तथापि, काही प्रशासकीय कारणास्तव सदरहू प्रसिध्द करावयाची पात्र/ अपात्र अर्जदारांची यादी दिनांक १५.०९.२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात येणार नसून काही दिवसांच्या कालावधीनंतर म्हाडाच्या उपरोक्त नमूद संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. तसेच २nd Cycle व ३rd Cycle बाबतचे सुधारित वेळापत्रक अथवा त्याबाबतचा सुधारित निर्णय देखील काही दिवसांच्या कालावधीनंतर म्हाडाच्या उपरोक्त नमूद संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

उपरोक्त बदलाबाबत सर्व संबंधितांनी कृपया नोंद घ्यावी.

स्वा/-
(गोपीनाथ ठोंबरे)
उपमुख्य अधिकारी(पणन)
मुंबई मंडळ, मुंबई

Scanned with CamScanner